# स्त्री चळवळ : दशा, दिशा आणि पुरुषांची भूमिका ( एक विश्लेषण )


**श्री. हर्षवर्धन सुर्यवंशी**(M.A.,SET,NET,JRF)

Lecturer @ SIAC Mumbai (Pre-IAS Training Centre, Govt. of Maharashtra),

Lecturer @ Administrative Career Academy, University Of Mumbai

Ph.D research scholar at University of Mumbai.



**सारांश (Abstract) :-**

*स्त्रीवाद ही सामाजिक शास्त्रातील विविध विचारसरणींतर्गत विकसित झालेली विचारसरणी आहे. या विचारसरणीतील प्रमुख चिंतनाचा विषय म्हणजे पुरुषप्रधान सामाजिक रचनेमुळे पुरुषांना मिळालेली अधिसत्ता आणि स्त्रियांवरती झालेला अन्याय हा आहे. उदारवादी स्त्रीवाद स्त्रीयांच्या नागरी हक्कांबाबत झगडतो, समाजवादी स्त्रीवाद स्त्रीयांच्या आर्थिक हक्कांबाबत झगडतो तर मूलगामी स्त्रीवाद स्त्रीयांवर होणाऱ्या शारिरीक अत्याचाराविरुद्ध झगडतो. पण या सर्वांमध्ये स्त्रीवादाचा प्रतिवादी पुरुष आहे. जवळजवळ सर्व स्त्रीवाद्यांनी स्त्रीवादाच्या लढाईत पुरुषांचे सहकार्य घेणे टाळले. पण स्त्रीवादाला सामाजिक अधिमान्यता प्राप्त करण्यासाठी पुरुषांचे सहकार्य अनिवार्य आहे. त्यामुळे स्त्री व पुरुषांमधील Thesis आणि Antithesis यांच्यामध्ये संघर्ष ऐवजी सहकार्य निर्माण होऊन स्त्री व पुरुषांमधे नवा Synthesis तयार होणे गरजेचे आहे जो जलद, मजबूत व शाश्वत असेल.त्यासाठी 'स्त्रीवाद'या लिंगाधारीत विचारसरणीच्याही पुढे जाऊन आता 'वैश्विक' विचारसरणीची आवश्यकता आहे.*


**प्रस्तावना -**

स्त्रीवादामधील प्रमुख चिंतनाचा विषय असलेली गोष्ट म्हणजे पुरुषप्रधान मानसिकतेमुळे पुरुषांना मिळालेली अधिसत्ता. राज्यशास्त्राच्या परिभाषेमध्ये या अधिसत्तेचे विश्लेषण केले असता मॅक्स वेबरच्या अधिसत्तेच्या प्रारुपाप्रमाणे ही अधिसत्ता परंपरागत अधिसत्ता आहे. त्यामुळे या अधिसत्तेला मिळालेली अधिमान्यतासुद्धा 'परंपरागत अधिमान्यता' आहे. समाजशास्त्र व राज्यशास्त्र असे सांगतात की, सामाजिक अधिमान्यता विधीवत विवेकी अधिमान्यतेत रुपांतरीत झाली तर विधीवत विवेकी अधिमान्यता मजबूत होण्यासाठी सामाजिक प्रवाह विचारी, विवेकी, खुले व मजबूत असावे लागतात. यासाठी समाजात संवाद,चर्चा व विचारविनिमय असणे गरजेचे असते. हे साध्य करत असताना आजअखेर स्त्रिवाद्यांनी पुरुषी वर्चस्वाविरुद्ध स्त्रियांमध्ये जाणीवजागृती करुन स्त्री-पुरुष समानतेची मागणी केलेली आहे. आधुनिक काळात बऱ्याच देशांमध्ये या मागणीला विधीवत विवेकी अधिमान्यतेचे स्वरुप आलेलेदेखील आहे. पण ही विधीवत विवेकी अधिमान्यता दृढ होण्यासाठी तीला सामाजिक अधिमान्यता मिळणे गरजेचे आहे. ही सामाजिक अधिमान्यता मिळण्यासाठी स्त्रिवादाच्या नव्या वळणावर पुरुषांना शत्रू किंवा प्रतिस्पर्धी न मानता सहयोगी मानून त्यांच्यात मानसिक परिवर्तन घडवणे गरजेचे आहे.

**स्त्रीवाद्यांच्या चिंतनाचा विषय**

स्त्रीवाद किंवा स्त्री चळवळ ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे सामाजिक-आर्थिक-राजकीय-कौटुंबिक अधिकार मागणारी चळवळ आहे. स्त्री चळवळीमध्ये स्त्रीला तिच्या लिंगाच्या आधारे मिळणारी भेदभावाची वागणूक आणि पुरुषी वर्चस्वाला विरोध केला जातो. जेसिका हॅंलेटी म्हणते - 'Feminism is not simply about being a women in position of power. Its battling systemic inequities, its social justice movement that believes sexism, racism and classism exist and interconnect and they should be consistently challenged '(1)

स्त्रीचे शोषण हे वैश्विक आहे. त्याच्या शोषणाचे प्रमाण आणि प्रकार स्थल-काळाप्रमाणे बदलतात. पण हे सत्य आहे,की, स्त्रीला तिच्या स्त्रीत्वा मुळे, तिच्या लिंगा मुळे, ज्या

शोषणाचा सामना करावा लागतो, त्याबाबत आजही जागृती कमी आहे. स्त्रियांना कमी लेखण्याची सवय स्वाभाविक झाली आहे. बऱ्याच वेळा स्त्रियांना त्यांच्या शोषणाची जाणीव सुद्धा नसते. त्यामुळे स्त्रीवाद स्त्रियांचे शोषण करण्याच्या विरोधात आहे, तसाच तो स्त्रियांमध्ये त्यांचे शोषण व असमानते विरोधात जागृती करणारा सुद्धा आहे. समाजात विविध सामाजिक संकेतांनी स्त्रियांच्या शोषणाला, विषमतेला मान्यता दिली आहे. त्या संकेतांच्या अधिमान्यते विरोधात स्त्रिया व पुरुषांमध्ये आणि सरकारी पातळीवर धोरणकर्त्यांमध्ये लक्ष वेधण्यासाठी स्त्री चळवळी धडपडत असतात.

**स्त्रीवादाविषयी राजकीय विचारवंतांचेचिंतन :**

सामाजिक शास्त्रांच्या तत्त्वज्ञानामध्ये, सिद्धांतांमध्ये पुरुष प्रधान विचारांचे प्राबल्य दिसते. प्लेटो व मील सारख्या विचारवंतांनीच स्त्री कडे लक्ष दिले आहे. अन्यथा बहुतेक प्रस्थापित विचारवंतांनीस्त्रियांच्या विषयाकडे दुर्लक्षकेले आहे. प्लेटोला पहिला स्त्रीवादी म्हणले जाते .कारण त्याने पहिल्यांदा स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देऊन स्त्री राज्यकर्ती तत्त्वज्ञ राज्ञी होऊ शकते असे विचार मांडले. [Plato, The Republic : concerning justice (386 BC)]

मात्र त्याचाच शिष्य असलेल्या अरिस्टॉटल ने स्त्रियांचे वरील सर्व अधिकार नाकारले [Aristotle, The politics (350 BC)]. इमॅन्युएल कान्ट जो सकारात्मक उदारमतवादी आधुनिक विचारवंत आहे, तो म्हणतो की, प्रत्येक व्यक्ती साध्य आहे पण साधन नाही.तथापि दुर्दैवानेत्याने हे तत्व स्त्रियांना लागू केले नाही. रुसोने तर स्त्री आणि पुरुष यांच्यात सरळ सरळ भेद करून स्त्रीयांसाठी वेगळ्या शिक्षणाची कल्पना मांडली, तर मार्क्स स्त्रियांविषयी काहीच बोलला नाही.

नीटझ्से या पुराणमतवाद्याने स्त्रियांना सार्वजनिक जीवनात प्रवेश दिल्यास समाजाच्या अस्ताचा प्रारंभ होईल असे भडक विधान केले, म्हणून डॉक्टर आंबेडकर त्याला पश्चिमेला मनू म्हणतात (डॉक्टर आंबेडकर- गांधी, रानडे आणि जिना ). एंजेल त्याच्या "ओरिजिन ऑफ फॅमिली प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड स्टेट" या पुस्तकांमध्येम्हणतो , भांडवलशाहीच्या अस्ता बरोबर स्त्रीयांचे शोषण संपेल.याचाच अर्थ तो स्त्रियांच्या शोषणाचे कारण 'व्यवस्थेला' मानतो 'प्रवृत्तीला' नाही.सायक्लोंथिया इनलोई म्हणतात आंतरराष्ट्रीय राजकारणात स्त्रिया कुठेच दिसत नाहीत कारण स्त्रिया अशक्त व अति भावनाप्रधान समजल्या जातात. [EynthiaEnloe, Globalisation and militarism : Feminist make the Link- Rowman& Littlefield Publishers (March 2007)]

**स्त्रीवादाच्या विकासाचे विविध टप्पे :**

**पहिला टप्पा : (उदारमतवादी स्त्रीवाद)**

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर 'Men are born free and equal' या तत्वाचा प्रचार झाला. त्यामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्य व समानते शिवाय सर्वांचे स्वातंत्र्य समानता साध्य होऊ शकत नसल्याचे लक्षात येऊ लागले. त्यातच प्रबोधनामुळे व्यक्तीच्या स्वायत्ततेचा उदय झाला. तसेच अमेरिकेमध्ये गुलामगिरी निर्मूलनासाठी सुरू असणारी चळवळ यामुळे मानवी दृष्टिकोन, विवेक, नैतिकता यांचा प्रचार झाला आणि स्त्रीवादी चळवळीचा उदय विकास झाला.

मेरी वोलस्टनक्राफ्ट ने तिच्या 'Vindication of Rights of Women' या पुस्तकात स्त्रियांच्या अधिकारांचा चिकाटीने आग्रह धरला.इमेलिन पॅनखुस्ट, एलिझाबेथ कॅडी यांनीसुद्धा स्त्रीमुक्तीचा आग्रह धरला. जेम्स मिल नेत्याच्या 'Subjection of women' या पुस्तकात स्त्रियांचा राजकीय आर्थिक अधिकारांचा आग्रह धरला.

पहिल्या टप्प्यामध्ये उदारमतवादी स्त्रीवादी स्त्रियांना मताधिकार मिळवण्यात यशस्वी ठरले पण काळाच्या प्रवाहात त्यांच्या हे लक्षात आले की स्त्रीमुक्तीसाठी निव्वळ मताधिकार उपयोगाचा नाही.

**दुसरा टप्पा :(समाजवादी स्त्रीवादी)**

रशियातील समाजवादी क्रांतीनंतर स्त्रियांच्या स्थानात प्रगती झाली. लेनिनने त्यांच्या मंत्रिमंडळात स्त्रियांना मानाचे स्थान दिले. पण पुन्हा स्टॅलिनच्या आगमनाने स्त्रियांच्या स्थानाला धक्का बसला. त्याच्या दृष्टीने स्त्रियांचे मुख्य काम मुले जन्माला घालणे हे होते. समाजवादी स्त्रीवाद्यांच्या प्रमुख मागण्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान वेतन, प्रसूतीची पगारी रजा मिळणे, इत्यादी होत्या.

**तिसरा टप्पा :(मूलगामी स्त्रीवाद) (Radical Feminism)**

सायमन बॅरोस याचे यांचे 'The Second Sex' पुस्तक आणि बेटी फ्रीडमन यांचे 'The Feminine Mystique' या पुस्तकाच्या प्रकाशनाने मूलगामी स्त्रीवादाची सुरुवात झाली. मूलगामी स्त्रीवादाला खरे स्त्रीवादी तत्वज्ञान म्हणून संबोधले जाते. पण उत्तर स्त्रीवाद्यांना हे मान्य नाही.

मूलगामी स्त्रीवाद्यांच्या मते स्त्रियांना जो दृश्य अदृश्य हिंसाचार सहन करावा लागतो त्याचे मुख्य कारण म्हणजे त्या लिंगाने पुरुषांपेक्षा भिन्न आहेत हे आहे. बेटी फ्रीडमननाUSA मधील उच्च व मध्यम वर्गांमधील राजकीय अधिकार असणाऱ्या, आर्थिक स्थिती चांगली असणाऱ्या स्त्रियांना सुद्धा जी वागणूक मिळते त्यामध्ये काही तरी Missing असल्याची जाणीव झाली. या Missing मधूनच "लिंग असमानता"(Gender Discrimination) आणि "पुरुष प्रधानता"(Patriarchy) या गोष्टींना मान्यता मिळते असेही ती म्हणते.

सेक्स आणि जेंडर यांच्यामध्ये मूलगामी वाद्यांच्यामते फरक आहे सेक्स ही जीवशास्त्रीय संकल्पना आहे तर जेंडर ही सामाजिक संकल्पना आहे. जन्माला आलेली स्त्री बालक व पुरुष बालक हे दोघेही शारीरिक ठेवणीद्वारे वेगवेगळे असतात. हे वेगळेपण म्हणजेSex Differentiationहोय. पण जेव्हा स्त्री बालकाला गुलाबी फ्रॉक घातला जातो आणि पुरुष मालकाला निळा शर्ट घातला जातो व भविष्यात त्यांच्यावर तेच संस्कार टिकवले जातात, त्याला Gender Differenceम्हणतात. या फरकाचे पालन करणे चांगल्या नारीचे लक्षण आहे असे स्त्रियांवर संस्कार केले जातात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव निर्देशांकामध्ये स्त्रिया पुरुषांच्या विकासातील निर्देशांकामध्ये असणारा फरक G.D चा परिणाम आहे. ( United Nations Human Development Report 2018)

**पुरुष प्रधानतेची संकल्पना (Patriarchy) :**

कुटुंबामध्ये वडिलांची सत्ता असणे म्हणजे Patriarchyहोय. वडिलांच्या सत्तेमुळे पुन्हा पुरुष प्रभाव आलाच.Patriarchy हा Gender Differenciation चा पुढचा सहज टप्पा आहे. या स्त्रीवाद्यांच्या मते आर्थिक संरचना हा समाजाचा मुख्य पाया नाहीतर पुरुष प्रधानता हा समाजाचा मुख्य पाया आहे.

केट मिलेट तिच्या 'Sexual Politics'या पुस्तकात आणि शूलस्मिथ फायर स्टोन तिच्या'Dialectics of Sex' या पुस्तकात अशी भूमिका मांडतात की, अभ्यासाच्या दृष्टिकोनातून स्त्रियांचे गौणत्व हे वर्गीय राजकारणापेक्षा प्राधान्याचे आहे. मार्क्सवाद्यांनी 'लिंग' या विषयाला राजकारणातून दुर्लक्षित करून असे प्रतिपादन केले की, एकदा वर्गीय संघर्ष संपला की आपसूकच स्त्रियांच्या व्यथा संपतील. मार्क्सवाद्यांनी घरगुती कामांमध्ये स्त्रियांच्या होणाऱ्या शोषणाचा विचार केला नाही.

Patriarchy हे धुरीणत्व(Hegemony) आहे,जे भांडवलशाहीच्या धुरीणत्वापेक्षा अधिक मजबूत आहे. स्त्रियांचे शोषण हे जगातील सर्वच संस्कृतींमध्ये आढळून येते. सायमन डे बियुवॉयर म्हणते, की पुरुष प्रधानता जगन्मान्य आहे, म्हणून तिचा स्वीकार करणे योग्य नाही. ती म्हणते, स्त्रियांनी स्वतःची जबाबदारी स्वतः घेऊन Patriarchyमधून बाहेर पडणे गरजेचे आहे. रॅडिकल स्त्रीवाद्यांचा भिन्नलिंगी कुटुंब पद्धतीला (Heterosexual) विरोध आहे.

**Personal Is Political -**

परंपरागत राजकीय विचारवंतांनीवैयक्तिक व राजकीय' किंवा 'खाजगी व सार्वजनिक' यामध्ये भेद केला. याची सुरुवात ॲरिस्टॉटलने केली.ॲरिस्टॉटलने स्त्रियांना सार्वजनिक क्षेत्रात प्रतिबंधित करून कुटुंबापुरतेमर्यादित ठेवले. हेगेलने कुटुंबाला निस्वार्थीपणाचे क्षेत्र म्हटले. स्त्रीवादी 'वैयक्तिक' आणि 'राजकीय' असा भेद न करता त्या दोन्हींना एकच म्हणतात. मग ते कुटुंब असो किंवा समाज असो, त्यांच्यासाठी पॉलिटिकल म्हणजे सत्ता- प्रभाव होय. ही सत्ता-प्रभाव स्त्रियांना समाजाबरोबर कुटुंबांमध्ये सुद्धा मिळाला पाहिजे.

या स्त्रीवाद्यांच्या दृष्टीने भिन्नलिंगी कुटुंब स्त्रीसाठी शोषणाचे क्षेत्र आहे.ते एखाद्या भयानक स्वप्न सारखे असते. केट मिलेट म्हणते, जात वर्ग आधारित प्रभावापेक्षा लिंगाधारित प्रभाव जुना आहे. त्यामुळे मार्क्सवादी म्हणतात त्याप्रमाणे वर्गसंघर्ष संपल्यावरच लिंग संघर्ष आपसूक संपेल हे चुकीचे

आहे. सुसन ओकीन तिच्या"Family, Gender & Justice" या पुस्तकामध्ये Personal is Political या संकल्पनेचे चार ध्वन्यार्थ सांगते–

1) कुटुंबामध्ये राजकारण असते म्हणजे कुटुंबात कोणीतरी कोणीतरी प्रभावी असते.
2) राज्य कुटुंबामध्ये थेट हस्तक्षेप करते. लग्न, घटस्फोट, वारस, दत्तक विधान या स्त्रियांच्या दर्जा संबंधित गोष्टींबाबत कायदे करून राज्य व्यक्तिगत जीवनाला सार्वजनिक कायदे लावते.
3) व्यक्तीचे व्यक्तिगत आयुष्यातील दृष्टिकोन त्याच्या राजकीय आयुष्यातील दृष्टिकोन तयार करत असतात. कुटुंबामध्ये होणाऱ्या पुरुष प्रधानतेच्या संस्कारामुळे व्यक्ती राजकीय व सार्वजनिक जीवनात त्याच प्रवृत्तीने वागत असते.
4) स्त्रियांवर त्यांच्या कुटुंबाच्या असणाऱ्या जबाबदारीमुळे त्यांचे श्रमावरील लक्ष विचलित होते. परिणामी त्यांची कामगिरी खालावते.

**स्त्रीयांविरुद्धचा होणारा हिंसाचार:**

उदार स्त्रीवाद्यांसाठी स्त्रियांचे नागरी व राजकीय अधिकार महत्त्वाचे आहेत. समाजवादी स्त्रीयांसाठी स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक अधिकार महत्त्वाचे आहेत. तर मूलगामी स्त्रीवाद्यांसाठी स्त्रीयांविरुद्ध होणारा हिंसाचाराचा मुद्दा महत्त्वाचा आहे.

वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात स्त्रियांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराचे मुख्य कारण पुरुष प्रधानता आहे. सुसन मिलर तिच्या 'Against Our Will'या पुस्तकात म्हणते,'बलात्कार ही उत्स्फूर्त लैंगिक प्रतिक्रिया नसते तर पुरुष प्रधान प्रवृत्तीमुळे पुरुषाने स्त्रीचा लैंगिकतेवर दाखवलेला अधिकार असतो ज्यामुळे स्त्रियांमध्ये स्वतःच्या लैंगिकतेविषयी सतत भीती निर्माण होत असते'

सायमन बोरोरसही तिच्या 'Second Sex'या पुस्तकात सिग्मंड फ्रॉईड या मानस शास्त्रज्ञावर त्याच्या स्त्रीविरोधी दृष्टिकोनावर टीका करते. फ्रॉईड म्हणतो स्त्रियांना पुरुषांनाआकर्षित करण्यासाठी चांगले दिसायचे असते. सिमोन ही गोष्ट नाकारू स्त्रियांना स्वतःसाठी चांगले दिसायचे असते असे म्हणते.

**स्त्रीवादी चळवळीमध्ये पुरुषांचीभूमिका:**

खरेतर स्त्रीवादी विचारधारा किंवा चळवळ ही मुळातच पुरुषांच्या"पुरुषी" समजांच्या विरोधात उभी राहिली. पुरुषांनीस्त्रियांचे अधिकार डावलले. स्त्रियांना दुय्यम महत्त्वाचा दर्जा दिला. पण म्हणून स्त्रीवादी चळवळींमध्ये पुरुषांचीमदत न घेणे चुकीचे ठरू शकते.शिरा टारंट त्यांच्यामते स्त्रीवादाच्या विविध टप्प्यावर पुरुष स्त्रीवाद्यांनी (Pro-Feminist) उल्लेखनीय कार्य केले आह. मायकेल फ्लड, मायकेल मेसनर, मायकेल किमेल या पुरुष स्त्रीवाद्यांनी बरेच योगदान दिलेले आहे.[ShiraTarrant : Men & Feminism (2009)]

सिमोनडी ब्युवॉईर सारखी मूलगामी स्त्रीवादी Pro-Feministलोकांना विरोध करते. तिच्यामते स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये असणाऱ्या जैविक लिंगभेदामुळे Pro-Feminist स्त्रियांच्या समस्या मुळापासून समजूच शकत नाहीत. ते केवळ सहानभूती दाखवू शकतात [Simon de Beauvoir, The Second Sex (1949)] पॉल स्मिथ आणि ॲलिस जॉर्डिन सारखे विचारवंत याला दुजोरा देतात. [Paul Smith, Men in Feminism (2012)] पण जर स्त्रीला मिळणाऱ्या दुय्यम दर्जाचा पुरुषी दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास पुरुषी वर्चस्व ही पुरुष सत्ताक समाजाची मानसिक गरज आहे. जी अत्यंत चुकीची आहे. समाज, राज्य हे व्यक्तींचे बनलेले आहे. त्यामुळे व्यक्तीचा जो स्वभाव असतो तोच राज्याचा समाजाचा स्वभाव असतो. प्लेटो म्हणतो 'Sate is Individual writ large'. तसेच हॉब्ज, लॉक व रुसो या सामाजिक करार वादांनी सुद्धा व्यक्तीच्या स्वभावानुसार राज्याचा स्वभाव रेखाटला आहे.'जे पिंडी ते ब्रम्हांडी' असेल तर मग ब्रम्हांड सुधारण्यासाठी पिंडामधूनसुरुवात केली पाहिजे.

**निष्कर्ष -**

महात्मा गांधीजीनी जाती निर्मूलनाविषयी हरिजन मध्ये एकदा म्हणाले होते की 'जाती निर्मूलन हे कायद्यापेक्षा लोकांच्या मानसिक परिवर्तनातून अधिक चांगल्या रीतीने होऊ शकते. कांटसुद्धा म्हणतो की 'It is will, not force, the Power behind law'.लोकांनी एखादी सुधारणा मनातून

स्वीकारली तर तिला कायद्याच्या अंमलबजावणीपेक्षा अधिक वेग येतो. त्यामुळे स्त्रीवादाकडे निव्वळ सहानुभूतीनेपाहणाऱ्या ढोंगी (Hypocratic) पुरुषांपेक्षा या विषयाकडे परांतराभूती (Empathetic)दृष्टीने सक्रिय असणाऱ्या पुरुषांच्या मदतीने स्त्रीवादाची चळवळ अधिक वेगवान होऊ शकते.

काल मार्क्स म्हणतो Thesis आणि Antithesis यांच्यामध्ये संघर्ष होऊन Synthesis होईल. या सिद्धांतानुसार स्त्रीवादी आणि पुरुषसत्ताकवादी यांच्यामध्ये संघर्ष होऊन नवा लिंगभेद विरहित समताधिष्ठित समाज निर्माण होईल. पण जर स्त्री वादामध्ये पुरुषांचीमदत घेतली, तर पुरुषसत्तावाद्यांकडून होणारा विरोध बराच कमी होईल. त्यामुळे Thesis आणि Antithesis यांच्यामध्ये संघर्ष ऐवजी सहकार्य निर्माण होऊन तयार होणारा नवा Synthesis हा जलद, मजबूत व शाश्वत असेल.

स्त्रीवाद ही आजवरच्या अनुभवानुसार काहीशी नकारात्मक संकल्पना आहे. पण आजच्या काळाची गरज लक्षात घेता,किंवा स्त्रीवाद यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी लक्षात घेता, पुरुषांचीमदत घेणे गरजेचे आहे. त्यातूनच स्त्रीयांच्या समानतेच्या मागणीच्या विधीवत अधिमान्यतेला सामाजिक अधिमान्यता मिळू शकते. ही सामाजिक अधिमान्यता मिळविण्यासाठी स्त्री आणि पुरुष असा भेद नाकारणाऱ्या मानववाद किंवा त्याच्या जवळपास जाणारी नवी विचारसरणी संशोधित होऊन मांडणे गरजेचे आहे. जेणेकरुन खेळ सिद्धांतानुसारस्त्री व पुरुष यांच्यात Zero Sum game न होता Win-Win game होईल.

**References :-**

1) Jessica Valenti, Full frontal Feminism (2007)
2) Jeorge Holland Sabine, A History of Political theory
3) SubrataMukharjee and SushilaRamaswamy, A history of political thought
4) J.S.Mill, On Liberty (1859)
5) Karl Marks and Engle, The Communist Manifesto (1859)
6) Plato, The Republic (386 BC)
7) Aristotle, Politics
8) Simone de Beauvoir, The Second Sex (1949)
9) Shira Tarrant, Men and Feminism (2009)
10)डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गांधी, रानडे आणि जीना (नेहरु प्रकाशन, 2013)